अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :- १.११.२०२३

## -: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३६ /२०२३ |
| कलम | कलम- ७ भ्र.प्र.कायदा १९८८ |
| आरोपी इसम | १) श्री. संतोष किरण जाधव वय ३५ वर्षे, पद- सहाय्यक पोलीस निरीक्षक . कार्यालय पत्ता :- काळाचौकी पोलीस ठाणे<br>२) श्री राम गोरक्षनाथ तुपे वय ३१ वर्षे, पद- पोलीस उप निरीक्षक कार्यालय पत्ता :- काळाचौकी पोलीस ठाणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ५०,०००/- |
| स्विकारलेली लाचेचीरक्कम | - |
| थोडक्यात माहीती | यातील फिर्यादी यांची मानलेली बहीण विजया देशमुख यांनी काळाचौकी पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या गु.र.क्र. ७१/२०२३ कलम ४०६,४२० भादवि मधील आरोपीस अटक केले म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उपनिरीक्षक राम तुपे काळाचौकी पोलीस ठाणे यांनी फिर्यादी यांचेकडे रू. ५०,०००/- रक्कमेची मागणी केली.<br>परंतु सदर लाचेची रक्कम यातील आरोपी लोकसेवक यांस देण्याची फिर्यादी यांची इच्छा नसल्याने फिर्यादी यांनी दिनांक ०४/१०/२०२३ रोजी रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०६/१०/२०२३ रोजी पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली असता, पडताळणी मध्ये यातील आरोपी लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांनी फिर्यादी यांच्याकडे मानलेल्या बहीणीने दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपीस अटक केली म्हणून व पैसे दिले नाही तर गुन्ह्यात आरोपी करतो असे म्हणून फिर्यादी यांच्याकडून रु ५०,०००/- रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शवली.परंतू आरोपी लोकसेवक यांना संशय आल्याने लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याकडून स्विकारली नाही. लाचेची मागणी स्पष्ट असल्याने दि. ०१/११/२०२३ रोजी यातील आरोपी लोकसेवक सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधव व पोलीस उप निरीक्षक राम तुपे यांचे विरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी - श्री. विजय पाटील, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग.
श्री. संजीव भोळे, अपर पोलीस उप- आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग.
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप- आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग.

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८,
वेबसाईट:- acbmaharashtra.gov.in,
ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप:- www.acbmaharashtra.net] टोल फ्री नं. १०६४